ग्राम पंचायत कार्यालय, चांदुर

दिनांक

ग्रामपंचायत कार्यालय, चांदुर जा.क्र. दि. पं.स. अकोला

इमारती बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र

(महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ पो.क्र.२)

प्रति,

श्री./श्रीमती ~~दिलीप देवचंदजी चौधरी~~

२१. अकोला

आपले दिनांक ..... चे अर्जावरुन आपणांस शेत सर्व्हे नं. 30/2 म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अभिन्यासातील भूखंड क्रमांक १ ते ५ व १६ ते 39 वर संभाव्य ईमारतीचे बांधकाम करण्याकरीता महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ व त्याखालील उपविधी खालील शर्तीसह ग्रामपंचायत ठराव क्र. ....९५..... दिनांक 23/02/२०१५ नुसार परवानगी देण्यात येत आहे.

१. भुखंडाचे चारही बाजुने खालील प्रमाणे मोकळ्या सोडवयाचे समासाचे अंतर सोडले असावे.
   - अ. समोरील बाजुने – ३.०० मिटर
   - ब. मागील बाजुने – १.५० मिटर
   - क. मागील बाजुने – १.५० मिटर
२. सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करावे. बांधकामात कोणताही फेरबदल करु नये.
३. सदर परवानगी तुम्हास तुमचे स्वत:चे मालकीचे भुखंडामध्ये बांधकाम करण्याकरिता बंधनकारक आहे. इतर कोणत्याही खाजगी दुसऱ्याचे मालकीचे भुखंडावर, सरकारी जमिनीवर तसेच तुमच्या स्वत:च्या मालकीच्या नसलेल्या भुखंडावर बांधकाम करु नये.
४. आजुबाजुने खाजगी अथवा सरकारी जमिनीवर अतिक्रमण करु नये.
५. संभाव्य इमारत बांधकामाची साहित्य बिना परवागनी सरकारी जमिनीवर रस्त्यावर ठेवू नये.
६. स्वत:चे भुखंडातील कोणतेही सांडपाणी, सेप्टीक संडासाचे पाणी, पावसाचे साचणारे पाणी हे स्वत: खर्चाने पक्क्या नालीव्दारे, पाईपव्दारे रस्त्या लगतच्या पक्क्या नालीव्दारे आणून सोडलेले असावे.
७. रुफ टॉप हार्वेस्टींग प्रोजेक्ट (छतावरील पाणी गोळा करणे) प्रकल्प कार्यान्वित करावा.
८. नकाशात दर्शविल्याप्रमाणे शौचालयाचे बांधकाम करावे.
९. सोबत जोडलेल्या नकाशात प्लॅनमध्ये दर्शविल्याप्रमाणे संभाव्य इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.
१०. बांधकाम परवानगी १२ महिन्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल.
११. बांधकाम पूर्ण झाले बरोबर ग्रामपंचायतीस लेखी मोजमापासह कळविणे बंधनकारक आहे.
१२. बांधकामामुळे ग्रामपंचायतचे रस्त्याचे / नालीचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपणाकडून करण्यात येईल.
१३. बांधकामाचे परिक्षेत्रात वृक्षकर अधिनियमानुसार वृक्ष लावून त्याची जोपासना करणे हे आपलेवर कायदेशिर बंधनकारक आहे.
१४. इमारत बांधकाम करावयाचा भुखंड राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग तथा जिल्हा मार्ग यांच्या लगत आल्यास संबंधीत प्राधिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत चादुर

सौ. जिजा रा. खुरसाडे
सरपंच,
ग्रामपंचायत चांदुर